


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे अंक : २६३ वा रविवार दि. २२ डिसेंबर २०२४ पृष्ठ ८ किंमत ३रुपये

# मुंबईसह इतर भागातील बांगलादेशींना परत पाठवणार-मुख्यमंत्री फडणवीस

वृत्तसंस्था/ नागपूर

मुंबईसह अन्य भागांतील अवैध बांगलादेशींचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या देशात परत पाठवण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. अधिवेशनाचे सूप वाजल्यानंतर पत्रकार परिषदेत बोलताना मुख्यमंत्र्यांनी सरकारच्या निर्णयाची माहिती दिली. बांगलादेशींच्या अवैध वास्तव्याबद्दल विचारले असता, त्यांना शोधून मायदेशी पाठवले जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ङ्गउपमुख्यमंत्री अजित पवार माझी परवानगी घेऊन बीड आणि परभणी येथील घटनेतील पीडिताची भेट घेण्यासाठी दुपारी गेले, त्यामुळे ते पत्रकार परिषदेत उपस्थित नाही,फ असे मुख्यमंत्र्यांनी सुरुवातीलाच स्पष्ट केले. ङ्गविदर्भातील सिंचनाचे क्षेत्र वाढविण्याठी हाती घेण्यात आलेल्या ८८ हजार कोटींच्या नदी जोड प्रकल्पामुळे १० लाख एकर ओलिताखाली येणार आहे. विदर्भासह मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकणातील मागास भागासह उर्वरित महाराष्ट्राचा समतोल विकास साधून आमचे सरकार महाराष्ट्रातील जनतेला न्याय देणार आहे,फ अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी विधानसभेत दिली. अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना जवळपास १६ हजार २१९ कोटी रुपयांचा निधी दिल्याचे सांगतानाच गडचिरोली स्टील सिटी म्हणून उदयास येत असून येत्या तीन वर्षांत गडचिरोलीतील नक्षलवाद आटोक्यात आणू,फ असेही ते म्हणाले. पीक विमा कंपन्यांच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी या प्रकरणाची सखोल चौकशी करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. विदर्भातील सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प येत्या सात वर्षांत मार्गी लागणार आहे. ८८ हजार कोटींच्या या प्रकल्पामुळे १० लाख एकर जमीन ओलिताखाली येणार आहे. या प्रकल्पामुळे ५५० किलो मीटर लांबीची नवी नदीच तयार होणार असून यामुळे विदर्भात मुबलक पाणी उपलब्ध होणार आहे. नाग नदीसुधाराला मान्यता मिळाली आहे. नाग-पोहरा-पिवळी नदी असा प्रकल्प असून, सांडपाणी या नद्यांमध्ये जाऊ नये यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यामुळे औद्योगिक क्षेत्रातदेखील वाढ होण्यास मदत होईल. मुबलक पाण्यामुळे विदर्भाच्या औद्योगिक विकासालाही गती मिळेल. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील



प्रकल्पांसाठी बळीराजा योजनेमुळे सिंचन-क्षेत्र वाढणार आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना सिंचन क्षेत्र वाढण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. कन्हान नदी वळण योजनेला मंजुरी दिली असून, ३२०० एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे,फ असेही त्यांनी सांगितले. केंद्र आणि राज्य सरकारने मोठी गुंतवणूक केल्याने गोसी खुर्द प्रकल्पाच्या माध्यमातून जलपर्यटनाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. अभोरा येथे जलपर्यटन तर भंडारा, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया या ठिकाणी वनपर्यटन सुरू करण्यात येणार आहे. यामुळे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. विशेष म्हणजे आंतरराष्ट्रीय दर्जाचे हे पर्यटनस्थळ निर्माण करण्यात येणार आहे,फअसे ते म्हणाले. गडचिरोली-चंद्रपूर-वर्धा- भंडारा- नागपूर या प्राधान्यक्रमाने खनिकर्म प्रकल्प हाती घेतले आहेत. यामध्ये गडचिरोलीत ५० हजार कोटींची औद्योगिक गुंतवणूक झाली असून, खनिजावर आधारित प्रकल्पामुळे गडचिरोली स्टील प्रकल्प म्हणून उदयाला येत आहे. चंद्रपूर येथे कोल गॅसिफिकेशन प्रकल्प करण्याचा निर्णय झाला आहे,फ असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

## रोहीची दुचाकीला धडक तीन जण जखमी...

जनसंचलन/मोताळा

रोहीच्या धडकेत दुचाकीवरील तीनजण जखमी झाल्याची घटना शुक्रवार दि. २० डिसेंबरच्या सायंकाळी वाघजाळ ते धा. बढे रोडवर रोहिणखेड शिवारात घडली. यामध्ये दुचाकीस्वार मस्तान शहा मकबूल शहा यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यांच्यावर जिल्हा रुग्णालय बुलढाणा येथे प्राथमिक उपचार करून जळगाव खान्देश येथील रुग्णालयात शनिवारी शस्त्रक्रिया करण्यात आली. दोघांवर जिल्हा रुग्णालय बुलढाणा येथे उपचार सुरू आहेत. मोताळा तालुक्यातील बाम्हंदा येथील मस्तान शहा मकबुल शहा (५०) हे दुचाकी क्र. (एम.एच.२८-एस-५५२६) ने श्याम बळीराम राठोड (२६) व सुरेश देवराव चव्हाण (२७) यांच्यासोबत २० डिसेंबर रोजी मोताळा येथून धामणगाव बढेला जात होते.. रोहिणखेड शिवारातील एका वळणावर त्यांच्या दुचाकीला रोहीने जबर धडक दिली. यामध्ये दुचाकी चालक मस्तान शहा मकबूल शहा यांच्या डोक्याला गंभीर मार लागला.




प्रथम जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार करून त्यांना जळगाव खान्देश येथील गोदावरी हॉस्पिटल येथे उपचारार्थ दाखल केले. त्यांच्यावर २१ डिसेंबरच्या सकाळी शस्त्रक्रिया करण्यात आली. सुरेश चव्हाण, श्याम राठोड हे दोघेही जखमी झाले आहेत.

## जानेफळ येथे मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट!

जनसंचलन/ जानेफळ

परिसरात मोठ्या प्रमाणात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला असून, चर्मरोगाने ग्रस्त असलेल्या मोकाट कुत्र्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जानेफळ परिसरात मोकाट कुत्र्यांच्या संख्येत कमालीची वाढ झाली आहे. या कुत्र्यांना चर्मरोगाची लागण झालेली असून, अनेक कुत्र्यांच्या अंगावरील संपूर्ण केस गळालेले असल्याने त्यांच्या शरीरावर मोठ्या प्रमाणात जखमा झालेल्या आहेत. मोकाट कुत्रे गावभर फिरत असल्याने त्यांच्या या चर्मरोगाचा परिणाम मानवी शरीरावर सुद्धा होत असल्याचे बोलल्या जात आहे. यामुळे बुलढाणा, मेहकर या सारख्या शहरात त्वचारोग तज्ज्ञांकडे जाऊन महागडा उपचार करावा लागत आहे. मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय, बुलढाणा येथे संत गाडगे बाबा यांची पुण्यतिथी साजरी...

**जनसंचलन/बुलढाणा**

द्वारका फाउंडेशनच्या सचिव ॲड. कीर्तिताई पऱ्हाड यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनापथकाच्या वतीने शुक्रवारी (दि. २०) कर्मयोगी गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त व्याख्यान व स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम प्रा. बी.व्ही.नरवाडे यांच्या हस्ते कर्मयोगी गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पी.एस.काटकर यांनी कर्मयोगी संत गाडगे बाबा यांच्या कार्याबद्दल माहिती तिला. ३९;कर्मयोगी गाडगे बाबा यांचे जीवनकार्य व दशसूत्री संदेश३९; या विषयावर प्रा. नरवाडे यांनी मार्गदर्शन मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये गाडगेबाबा यांच्या जीवन कार्याचा आढावा विशद केला. विद्यार्थ्यांमध्ये गाडगेबाबांनी विशद केलेल्या दशसूत्रीतील मूल्यांची रुजवणूक व्हावी, असे




त्यांनी भाष्य केले. तर प्रा. पंकज राणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कर्मयोगी गाडगेबाबा यांनी त्यांच्या हयातीत कीर्तनाच्या माध्यमातून अंधश्रध्दा, नवसप्रथा यावर प्रबोधन करून सर्वसामान्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्याचे कार्य केले. तसेच दशसूत्रीतील अन्न, वस्त्र, रोजगार, शिक्षणासाठी मदत, औषधोपचार या संदेशातून भोळ्याभाबड्या जनतेला उन्नतीचा मार्ग दाखविला यावर मार्मिक भाष्य केले. या अभिवादन कार्यक्रमासाठी सर्व विभाग प्रमुख, प्रा. नितीन पायघन, प्रा. पी.एस .राणे ,प्रा. खान, प्रा. कुहिरे, प्रा. राणे मॅडम , प्रा. देशपांडे , प्रा. सुरडकर, प्रा. पिंपळे, प्रा. सरोदे मॅडम, प्रा. चौधरी मॅडम , सौ. सरकटे , प्रा. पोपळघट प्रा.लाहोटी , श्री. शिंदे , श्री. देवकर, श्री. सिरसाट, श्री ठोमरे , श्री नेमाडे , श्री पुराणे, श्री गवई, श्री. खोलगडे श्री, पवार तसेच आदी सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व महाविद्यालयीन विध्यर्थ्यांनी या अभिवादन कार्यक्रमासाठी साठी उपस्थित राहून कर्मयोगी संत गाडगे बाबा याना अभिवादन केले.

# जिजाऊ ज्ञान मंदिर स्कूलचे पाच विद्यार्थी राज्यस्तरावर!

**जनसंचलन/बुलढाणा**

पळसखेड भट येथील जिजाऊ ज्ञान मंदिर स्कूल ॲन्ड ज्यु, क्रॉप सायन्स कॉलेजमधील पाच विद्यार्थ्यांनी विभागीय शालेय जीत- कून-दो स्पर्धेत चमकदार कामगिरी केली आहे. त्यांची राज्यस्तरावर निवड झाली आहे. जिजाऊ ज्ञान मंदिर स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या ५ विद्यार्थ्यांचा चमू अकोला येथे झालेल्या विभागीय जीत-कून-दो स्पर्धेत सहभागी झाला होता. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रतिस्पध्र्यांसोबत चुरशीची खेळी करत पाचही स्पर्धकांनी विजय मिळवला. यामध्ये १४ वयोगटांमध्ये स्नेहल गजानन चिंचोले, १७ वर्षे वयोगटात समर्थ मदन देशमाने व आदित्य जीवन सिरसाट व १९ वयोगटात सानिका राजू धनवे व यश देवीदास पन्हाड या पाच विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. याबरोबरच त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना संस्था अध्यक्ष संदीप शेळके, क्रीडा शिक्षक भूषण सिरसाट, प्राचार्य किशोर सिरसाट आदींसह इतर शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# गो. से. महाविद्यालयामध्ये रा. से. यो. पथकाद्वारा संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी साजरी..




**जनसंचलन/खामगाव**

स्थानिक विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित गो. से महाविद्यालय, खामगाव च्या राष्ट्रीय सेवा योजना पथका द्वारा संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. सदर पुण्यतिथी प्रत्यक्ष स्वच्छता कृती कार्यक्रम राबवून व संत गाडगेबाबा यांच्या जीवनावरील आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा यावेळी आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवात दीप प्रज्वलन तथा संत गाडगे महाराजांच्या दशसूत्री वरील ज्ञानावरील विचार मंथनाने झाली. याप्रसंगी संत गाडगेबाबांचा आदर्श आपण आपल्या आयुष्यामध्ये घ्यावा असे प्रास्ताविकामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे सह-कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.दीपक नागरिक यांनी सांगितले. संत गाडगेबाबा हे एक युगपुरुष असून विद्यार्थ्यांकरिता संत गाडगेबाबा आदर्श स्थान असल्याचे प्रतिपादन यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे सहाय्यक कार्यक्रमाधिकारी प्रा. उमेश खंदारे यांनी केले. आजच्या काळात सुद्धा गाडगेबाबांचे विचार अत्यंत प्रेरणादायी असल्याचे राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रमाधिकारी सौ. डॉ. नीता बोचे यांनी सांगितले. तर अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर यांनी संत गाडगेबाबांच्या जीवन पटावर प्रकाश टाकला व कृती मधून खऱ्या अर्थाने संत गाडगेबाबांना अभिवादन केले जाऊ शकते असे सांगितले. यानंतर प्रत्यक्ष कृती कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक तथा स्वयंसेविकांनी स्वच्छता कार्यक्रम राबविला. कार्यक्रमाचे संचलन कु. वैष्णवी गणेश तायडे व कु. आरती संतोष भगत यांनी केले तर आभार प्रदर्शन आनंद कतोरे यांनी केले. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

# प्रफुल्ल पाटीलचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला!

**जनसंचलन/मलकापूर**

कापूस खरेदीत शेतकऱ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी मुख्य आरोपी डॉ. प्रफुल वासुदेव पाटील ऊर्फ पप्पू डॉन यांचा जामीन अर्ज मलकापूर विद्यमान जिल्हा व सत्र न्यायालयाने गुरुवारी फेटाळला. मलकापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना जास्त भावाने कापूस खरेदी करण्याचे आमिष देत कापूस खरेदी केला. त्या कापूस खरेदी रकमेचा परतावा दिला नाही, त्यामुळे आरोपीविरुद्ध मलकापूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता त्यामध्ये आरोपी



डॉ. प्रफुल्ल वासुदेव पाटील ऊर्फ पप्पू डॉन याच्याविरुद्ध व त्याच्या सहकाऱ्याविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ४२० ४०६, १२० ब आणि ३४ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाख बुलढाणाचे उपनिरीक्षक राऊत करीत आहेत. आरोपीने जामिनासाठी अर्ज केला. गुरुवारी न्यायाधीश एस. व्ही जाधव यांनी तो फेटाळला.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# तुरीचे उभे पीक कापले अज्ञातावर गुन्हा दाखल...

**जनसंचलन/किनगाव जटू**

असलेल्या किनगाव जग येथील शेतकऱ्याची जमीन वसंतनगर शिवारात असून, शेतातून अज्ञात व्यक्तीने तुरीची उभी झाडे कापून नेल्याची घटना दि. २० डिसेंबरला उघडकीस आली. याप्रकरणी शेतकऱ्याने पोलिसात तक्रार दाखल केली असून, अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किनगाव जग येथील शेतकरी काशिनाथ राऊत यांची जमीन वसंतनगर शिवारात गट नंबर ३९ मध्ये चार एकर बारा गुंठे असून, एका हेक्टरमध्ये सोयाबीन पेरलेले होते. त्यामध्ये आंतरपीक म्हणून तुरीची पेरणी केली. सोयाबीन सोंगणी केल्यानंतर तुरीच्या झाडाला खत व पाणी दिल्यामुळे तूर चांगल्या प्रकारे आली होती. १९ डिसेंबरला अज्ञात व्यक्तीने शेतामधील काही तुरीची झाडे कुणीतरी अज्ञात व्यक्तीने कापून नेल्याने जवळपास आठ हजार रुपयांचे नुकसान केले आहे. प्रकरणी बीबी पोलिस स्टेशनला तक्रार देण्यात आली आहे. त्यावरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला.

# सर्व्हर समस्येमुळे धान्य वितरण ठप्प

## जळगाव जामोद तालुक्यातील चित्र दुकानदारांसह ग्राहक त्रस्त !

**जनसंचलन/ जळगाव जामोद**

सतत चार ते पाच दिवसांपासून सर्व्हरच्या समस्येमुळे जिल्ह्यासह जळगाव जामोद तालुक्यातील स्वस्त धान्य वितरण व्यवस्था कोलमडली आहे. त्यामुळे स्वस्त धान्य दुकानदारांसह ग्राहक त्रस्त झाले आहेत. शासनाने वितरणात पारदर्शकता यावी, यासाठी फोरजी ई-पॉस मशीनद्वारे सार्वजनिक वितरण व्यवस्था आणली आहे. रेशन-वर मिळणारे धान्य हे मशीनद्वारे लाभार्थ्यांना वितरित करण्यात येते; परंतु, काही दिवसांपासून सर्व्हर प्रॉब्लेम येत असल्याने ग्राहकांना अक्षरशः स्वस्थ धान्य दुकानात पायपीट करावी लागत आहे. त्यातच धान्य दुकानदार ग्राहकांना उत्तर देता देता मेटाकुटीस आले आहेत. वितरणादरम्यान स्वस्त धान्य दुकानदार व ग्राहक यांच्यामध्ये शाब्दिक चकमक सुद्धा होत आहे. शासनाने सहा-सात महिन्यांपूर्वी कालबाह्य झालेल्या टूजी मशीन बदलून फोरजी मशीन स्वस्त धान्य दुकानदारांना दिल्या. त्याचा काही एक उपयोग होताना दिसून येत नाही. सतत सर्व्हर समस्येमुळे वितरण व्यवस्था ठप्प झाली. पाच-सहा महिन्यांपासून ज्वारी वितरण चालू आहे. त्यामुळे गव्हाचे प्रमाण कमी झाले.

# जिजामाता महाविद्यालयात शिक्षणमहर्षी डॉ पंजाबराव देशमुख जयंती उत्सवाचे आयोजन

**जनसंचलन/बुलढाणा**

स्थानिक जिजामाता महाविद्यालयात दिनांक २३ ते २९ डिसेंबर २०२४ या कालावधीत श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती चे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे १२६ व्या जयंती वर्षानिमित्त महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन व जयंती उत्सवाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन उपाख्य भैय्यासाहेब देशमुख तसेच कार्यकारिणीचे मार्गदर्शनात करण्यात आले आहे. दिनांक २३ व २४ डिसेंबर रोजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक २५ डिसेंबर रोजी दुपारी जयंती उत्सव उद्घाटन समारंभ प्राचार्य डॉ सुरेश गवई यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमाचे उद्घाटन इतिहास अभ्यासक प्रमोद टाले यांचे हस्ते तर महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष प्रा. सुनील सपकाळ, महाविद्यालय विकास समिती चे सदस्य तथा संस्थेचे आजिवन सदस्य अनुक्रमे अॅड. बाबासाहेब भोंडे, प्रा माधवराव बाहेकर, प्रा. जगदेवराव बाहेकर, अॅड. भालचंद्र पवार, शाळा समिती सदस्य श्री व्ही. टी. देशमुख यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे..

दुपार नंतर विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कला गुणांना संधी मिळावी म्हणून सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यापुर्वी सकाळी ७.३० वाजता संस्थेचा ध्वजारोहण कार्यक्रम, त्यानंतर महाविद्यालय शाळा समिती सदस्या श्रीमती शकुंतलाबाई सोनुने व डॉ इंदुमती लहाने यांचे हस्ते रांगोळी, पोस्टर्स, भिंतीचित्र , डिशडेकोरेशन स्पर्धा व ग्रंथप्रदर्शनीचे उद्घटन आयोजित करण्यात आले आहे. तसेच वादविवाद स्पर्धा, गित गायन, काव्यवाचन व डॉ पंजाबराव देशमुख यांचे जीवन व कार्य या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक २६ डिसेंबर रोजी डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे जीवन व कार्याचे जाणीव व जागृती निमित्ताने विविध देखावे व वेशभुषा साकारुन बुलढाणा शहरातुन श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या शाळा व महाविद्यालयाची प्रभात फेरी आयोजित करण्यात आली आहे. त्यानंतर दुपारी विद्यार्थ्यांना व्यावसायीक शिक्षण व कौशल्य आत्मसात करण्याचे दृष्टीने आनंद मेळावा आयोजित करण्यात आला आहे. दिनांक २७ डिसेंबर रोजी सकाळी शिक्षणमहर्षी डॉ पंजाबराव उपाख्य



भाऊसाहेब देशमुख यांना जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दिनांक २७ ते २९ या कालावधीत महाविद्यालय माजी विद्यार्थी संघाचे क्रिकेट सामने आयोजीत करण्यात आले असुन त्यासाठी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्रा सुनील सपकाळ, प्रा सुरेश देवकर माजी विद्यार्थी तथा सदस्य महाविद्यालय विकास समिती हे उद्घाटक म्हणुन उपस्थित राहातील. या कार्यक्रमांचा लाभ महाविद्यालयातील सर्व आजी माजी विद्यार्थी, शिवपरीवारावर प्रेम करणारे शहर व परिसरातील पालक व नागरिकांनी घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ सुरेश गवई, जयंती उत्सव आयोजन समितीच्या समन्वयक प्रा. मृणालिनी हर्षवर्धन सपकाळ तसेच संयोजन समितीचे सदस्य, महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वतीने करण्यात आले आहे.

# पलसिद्ध मठ हा ज्ञान आणि धनाने भरलेला दिगंबर शिवाचार्य महाराज यांचे प्रतिपादन

**जनसंचलन/ साखरखेर्डा**



सिद्धलिंग शिवाचार्य महाराज आज ८६ वर्षांचे झाले असले, तरीही ते मनाने तरुण आहेत. एक हजार वर्षाच्या या मठाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी अविश्रांत परिश्रम घेतले. सिद्धलिंग शिवाचार्य महाराज यांच्या आशीर्वादात ज्ञान आणि भाव प्राप्तीची उपलब्धी असून, पलसिद्ध मठ हा ज्ञानाने आणि धनाने भरलेला आहे, असे मत वसमत पिठाचे मठाधिपती दिगंबर शिवाचार्य महाराज यांनी व्यक्त केले. ते दि १७ डिसेंबर रोजी श्रीमज्जगद्गुरू पलसिद्ध महास्वामी मठात शिवाचार्य रत्न सिद्धलिंग शिवाचार्य यांच्या जन्मोत्सवानिमित्त साखरखेर्डा येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी मठाधिपती सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज, शिवचैतन्य शिवाचार्य महाराज, विश्वचैतन्य शिवाचार्य महाराज, महादेव शिवाचार्य महाराज, माजी आमदार डॉ संजय रायमुलकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब गावंडे, ठाणेदार गजानन करेवाड, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक बाजड उपस्थित होते. मठाधिपती सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज यांनी आपण स्वत:ला पलसिद्धांचरणी अर्पण केले असून, अखेरच्या श्वासापर्यंत सिद्धलिंग शिवाचार्य महाराज यांच्या छत्र छायेखाली राहणार असल्याचे सांगून धर्म प्रचारासाठी भारतभर भ्रमण करीत असल्याचे त्यांनी सांगितले,



# तो अल्पवयीन मुलीला म्हणाला तुझ्यावर प्रेम करतो नकार दिला तर लग्न होऊ देणार नाही!...

## कोर्टाने आता त्याला सुनावली ३ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा!

**जनसंचलन/बुलढाणा**

मी तुझ्यावर प्रेम करतो..मला तू आवडतेस!तुझ्याशी लग्न करतो.. अन्यथा तू नकार दिल्यास तुझे लग्न होऊ देणार नाही! म्हणत एका आरोपीने अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्यामुळे जिल्हा न्यायालयाने आरोपी शंकर रामभाऊ जाधव (२१) रा.मंगरूळ नवघरे ता. चिखली जि. बुलढाणा याला ३ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.हा न्याय निवाडा श्री.मेहेरे विशेष न्यायाधीश यांनी केला. हकीकत अशी आहे की, ०९ सप्टेंबर २०२१ रोजी पिडीत मुलगी ही तिच्या लहान बहिणी सोबत बक-या चारण्याकरिता गेली होती. त्याठिकाणी आरोपी हा मोटारसायकलवर पिडीत मुलीजवळ आला व म्हणाला की, मी तुझ्यावर प्रेम करतो तु खुप सुंदर दिसते. नाही तर मी तुझे लग्न होउ देणार नाही. त्यावेळी पिडीतेने आरोपीस नकार दिला. त्यानंतर सुध्दा आरोपी परत पिडीतेस म्हणाला की, एक वेळ मला जवळ येऊ दे असे म्हटले असता, पिडीता ही भितीने घराकडे निघाली.दरम्यान आरोपीने मोटारसायकलने तिचा पाठलाग केला. सदरची घटना पिडीतेने तिच्या आईवडिलांनी रात्री ते जेंव्हा बाहेरगावावरून घरी परत आले होते त्यावेळेस सांगीतली. यावरून पिडीतेच्या आईने पिडीतासोबत जावून पोलीस स्टेशन अमडापूर येथेआरोपी विरूध्द तक्रार दाखल केली. आरोपीविरूध्द अपराध क्रमांक ४६३ /२०२१ नुसार कलम ३५४अ, ३५४ड, ५०४ भादंवि व सह कलम ११ व १२ पोक्सो कायदयानुसार गुन्हा दाखल केला. सदर गुन्हयाचा तपास पो.उपनिरीक्षक पांडुरंग शिंदे यांनी केला व आरोपीविरूध्द पुरावा मिळून आल्याने दोषारोप पत्र विशेष न्यायालय, बुलढाणा येथे दाखल केले. सदरचे प्रकरण सरकार पक्षातर्फे चालविण्याकरिता विशेष सरकारी वकिल ॲड. संतोष खत्री यांचेकडे सोपविण्यात आले. त्यांनी सदर प्रकरणामध्ये सरकारी पक्षातर्फे एकुण ०८ साक्षीदार तपासले. विशेष सरकारी वकिल संतोष खत्री यांनी एकूण न्यायालयासमोर नोंदविलेल्या पुराव्या माध्यमातून पिडीता ही अल्पवयीन असल्याची तसेच आरोपीने पिडीतेचा विनयभंग करून तिचा पाठलाग केल्याबाबतचे साबीत केले व प्रखर युक्तीवाद केल्यानंतर व न्यायालयासमोर उपलब्ध असलेल्या पुराव्यावरून विशेष न्यायाधीश श्री आर.एन.मेहरे साहेब यांनी २० डिसेंबर रोजी आरोपी शंकर रामभाऊ जाधव, वय वर्षे २१ राहणार मंगरूळ नवघरे तालुका चिखली जिल्हा बुलढाणा या विरुद्ध कलम ३५४-



अ मध्ये ३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा तसेच रूपये ३००० दंड ठोठावला आहे. दंड न भरल्यास तीन महिने साध्या कारावासाची शिक्षा सुध्दा ठोठावली तर ३५४-ड तीन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा तसेच रूपये ३००० दंड आरोपीस ठोठावला. दंड न भरल्यास तीन महिने साध्या कारावासाची शिक्षा सुध्दा ठोठावली.सदर प्रकरणामध्ये सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील ॲड. संतोष खत्री बुलडाणा यांनी कामकाज पाहिले त्यांना कोर्ट पैरवी पो.हे.कॉ. शांताराम जाधव, पो.स्टे. अमडापूर यांनी सहकार्य केले.

# अमित शहा विरूध्द वंचितच्या वतीने मलकापूर येथे करण्यात आले जोडा मारों आंदोलन

**जनसंचलन/मलकापूर**

भारतीय संसदेत संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबतीत बेताल व वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या केंद्रीय गृहमंत्री अमित शहा याच्याविरुद्ध मलकापूर येथे तीव्र प्रडसाद उमटले आहे, मलकापूर येथे वंचित बहुजन आघाडी व आंबेडकरवादी जनतेच्या वतीने निषेध करून जोडा मारो आंदोलन करण्यात आले सदर आंदोलनाची सुरुवात स्थानिक रेल्वे स्टेशन जवळील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास महिलांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली या आंदोलनाचे नेतृत्व वंचितचे बुलढाणा जिल्हा महासचिव अतिशभाई खराटे तथा तालुका नेते अजयभाऊ सावळे, तालुकाध्यक्ष सुशीलभाऊ मोरे यांनी केले यावेळी देशाचे महामहीम राष्ट्रपती यांना उपविभागीय अधिकारी मलकापूर यांच्यामार्फत दिलेल्या निवेदनात मागणी करण्यात आली की भारतीय संविधानाचे



शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबतीत भारतीय संसदेत आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर हे नाव घ्यायची फॅशन झाली आहे एवढे वेळा देवाचे नाव घेतले असते तर स्वर्ग मिळाला असता असे अवमानकारक वक्तव्य केल्यामुळे भारतीय जनतेच्या भावना दुखावलेल्या आहेत त्यामुळे भारतीय जनतेच्या भावनांचा गांभीर्यपूर्ण विचार करून आपल्या अधिनस्त केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या गृहमंत्री पदाचा राजीनामा घ्यावा अशी मागणी करण्यात आली यादरम्यान उपविभागीय अधिकारी कार्यालयाजवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा सन्मानार्थ डोक्यावर निळी टोपी घालून त्यांचा प्रतिमा व विविध स्लोगन असलेले पोस्टर झळकवण्यात आले तर याविरुद्ध अमित शहा च्या निषेधार्थ असलेले पोस्टर सुद्धा आंदोलनामध्ये प्रकर्षाने दिसत होते, डॉ.बाबासाहेब आंबेडकर के सन्मान में, आंबेडकरवादी आये मैदान मे.. आंबेडकर फॅशन नही, इस देश का पॅशन है..! अमित शहा मुर्दाबाद..अमित शहा राजीनामा दो.. या घोषणा देत गृहमंत्री अमित शहाच्या फोटोला जोडे मारण्यात आले व तीव्र निषेध करण्यात आला

# डॉ. होमीभाभा परिक्षेत सहकर विद्या मंदिरच्या विद्यार्थ्यांचे सुयश



**जनसंचलन/बुलढाणा**

मुंबई सायन्स टिचर्स असोसिएशन च्या वतीने घेण्यात आलेल्या डॉ. होमीभाभा बालवैज्ञानिक परीक्षेत सहकार विद्या मंदिर, बुलडाणा येथील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले. सदरहु परीक्षा तीन टप्यात होत असुन याचा प्रथम टप्पा दि.३०/११/२०२४ रोजी घेण्यात आला. यापरीक्षेमध्ये वर्ग ६ वी चे विद्यार्थी कु. आराध्या कोलते, चि.त्रिलोकश भवटे, अर्जुन किनगे, मिथीलेश जाधव, रोमित मेटकर, स्वजित दांडडे, यश लवंगे. तसेच वर्ग ९ वी चे चि.पार्थ तायडे, सुशांत भगतया विद्याथ्र्यांनी यश प्राप्त केले असुन त्यांची द्वितीय टप्यासाठी निवड झाली आहे. द्वितीय टप्यातील वर्ग ६ वी ची परीक्षा दि.०५/०१/२०२५ व वर्ग ९ ची दि.१९/०१/२०२५ रोजी होणार आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. राधेश्यामजी चांडक, संस्थेचे मुख्य कार्यकारी संचालक डॉ. सुकेश झंवर, संस्थेच्या अध्यक्षा सौ. कोमल झंवर यांनी कौतुक केले असुन त्यांना पुढील स्पर्धेकरीता शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यार्थीनी त्यांच्या यशाचे श्रेय संस्थेच्या अध्यक्षा, प्राचार्य, शिक्षक व पालकांना दिले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958